# नांदा सौख्यभरे

भारतीय पद्धतीने लग्न - पण कुणालाच मांडी घालून बसणे शक्य नसल्याने वधू-वर, त्यांचे आई वडील खुर्च्यांवर, होम मात्र जमीनीवर. तो होम सुद्धा त्यांच्या समोर एका टेबलावर का ठेवत नाहीत. असा माझ्या मनात विचार येतो. सर्वात कहर होतो सप्तपदीतील प्रत्येक स्टेपचा अर्थ हे पुरोहित इंग्रजीतून सांगतात तेव्हां (व उपस्थित गोरे लोक तो समजला म्हणून माना डोलावतात.) जे काय चालले आहे ते सर्व समजायलाच हवे हा आग्रह का तेच कळत नाही. माझ्या लग्नात भटजी संस्कृतमधून काय सांगत होते ते मला कुठे कळत होते आणि त्या भटजींचा तसा आग्रह नव्हता. लग्नानंतर जेवण व दक्षिणा यावर फक्त त्यांचा डोळा होता. त्यावेळी बायकोचा हात धरून सात पावलेच काय मेरी गो राऊंडसारखे एक तास गोल गोल फिरायचीसुद्धा माझी तयारी होती. लहानपणी अक्षता पडल्या म्हणजे आता पेढे मिळणार तसे अमेरिकेतील समारंभात एकदा लग्न लागले म्हणजे उत्तेजक पेयांची वेळ झाली म्हणून मला आनंद होतो.

भारतातील लग्नात त्या लॉन्सच्या बाहेर येथे कोणाचे लग्न आहे याची मोठी पाटी झळकत असते त्यामुळे तुम्ही भलत्याच लग्नात शिरण्याची शक्यता नसते. या पाट्यांची जरूरीच असते कारण आत शिरताच फारच थोडे लोक तुमच्या ओळखीचे असतात. लॉन्सवरील असंख्य खाद्यपदार्थांच्या टेबलांवरून विविध खमंग वास येत असतात. मला लगेच तिकडेच मोर्चा वळवायचा असतो पण नाईलाजाने मुख्य स्टेजजवळ वधु-वर व त्यांचे आई वडील यांना भेटण्यासाठी पोलीसांच्या लाईनअप सारखी लाईन लागलेली असते तेथे मी नंबर लावतो. मी पोलीसांची लाईनअप यासाठी म्हणतो की स्टेजवर पोचताच 'मी कोण ओळखा पाहू ?' हा खेळ सुरू होतो. बहुतेक उपस्थित मंडळी वधुवरांच्या ओळखीची नसतात. त्यामुळे त्यांची नातेवाईक मंडळी ओळख करून द्यायला लागतात -

'अरे हे आमच्या ऑफिसातले हेड क्लार्क कर्वे'

'नाही माझे नाव बर्वे'

'हो बरोबर, मी कसा विसरेन'

अशा प्रकारे ही ओळख परेड सुरू होते. मग स्टेजवरील व्यक्तीच्या थोरपणाच्या

वर्गीकरणाप्रमाणे फोटोग्राफरला फोटो काढण्याची ऑर्डर सुटते. आई वडीलांच्या नजरेच्या इशाऱ्याप्रमाणे वधुवर वाकून नमस्कार करतात. व्हिडीओ घेणारा माणूस फक्त सुंदरींना टिपण्यात मग्न असतो. बाकीच्यांना प्रभादेवी गणपती मंदिरामध्ये देवासमोर पोचताच नमस्कार होण्याअगोदरच 'चला पुढे' म्हणून ढकलले जाते तसे स्टेजवरून खाली उतरविण्याची घाई केली जाते.

अमेरिकेतील लग्न लागले की बालगंधर्व रंगमंदिराच्या तिकीट खिडकीवर झुंबड उडते तशी आपले टेबल कुठले हे पाहण्यास रांग लागते. आपल्या टेबलावरील सर्वजण आपल्या ओळखीचेच आहेत, उगाच नवीन व्यक्तीला भेटून त्याची ओळख करून घेण्याचे कठीण काम आपल्याला करावे लागणार नाही याची खातरजमा झाल्यावरच उपस्थित मंडळी स्नॅक्सचा समाचार घेतात. भारतात जेव्हां बफे पद्धत नव्हती तेव्हां पंगतीत नंबर लावणे हे एक दिव्य असायचे. आता बफे पद्धतीमुळे ती अडचण दूर झाली आहे. अमेरिकेत पंगतीत नंबर लावायचा नसतो. पण जेवणाअगोदरचे इतर समारंभ पाहण्याची शिक्षा असते अथवा तुमच्या मनाविरूद्ध त्यात सामील व्हावे लागते.

तो डिजे 'गिव्ह देम अ बिग हँड' चा सपाटा लावतो. मग शँपेन टोस्ट नंतर नातेवाईकांची व वधुवरांच्या मित्रांची भाषणे ऐकावी लागतात. (ते काय बोलत आहेत हे त्या दोघांनाच ठाऊक असते.) आपल्यात वेडिंग रिहर्सलची पद्धत आता हळूहळू रूढ होत चालली आहे. ही भाषणे ऐकली की कमीत कमी त्याची तरी रिहर्सल हवी असे वाटते. मग विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाला सामोरे जावे लागते. कुटुंबात मुलींची संख्या जेवढी जास्त तेवढी नाचांची संख्या वाढत राहते. काही जण मोठ्या पडद्यावर वधुवर रांगत असल्यापासूनचे फोटो दाखवतात. त्यानंतर वधुवरांचा पहिला एकत्र नाच पाहण्याची सक्ती होते. तो नाच पाहून ते चांगले रांगत होते असे माझे स्पष्ट मत बनते. मग वर आणि वराची आई, वधु आणि तिचा पिता अशा नाचाच्या जोड्या पडतात. सबंध रात्र उपस्थितांमधून अशा चिठ्ठ्या टाकून नाच करण्याची एक गेम ठेवावी त्यामुळे उपस्थितांची जास्त करमणूक होईल असा विचार माझ्या मनांत येतो.

लग्न म्हणजे उत्तम जेवण या माझ्या लहानपणच्या समजुतीला अमेरिकेत एकदम धक्का बसला आहे. पंजाबी जेवणाचे वर्चस्व, कोठेही जा, तोच मेनु तीच चव, डिशेस लहान ज्यात सर्व पदार्थ मावतही नाहीत, बफे असला तरी परत जाण्याची संधी मिळत नाही या उलट भारतात आजकाल रिसेप्शन्स मधील डिशेसचा आकार पाहिला आहेत का? डिशेस कसल्या मोठ्या ढालीच त्या. कितीतरी पदार्थ.

कोणत्याही प्रकारचे पदार्थ हवे तेवढे घ्या. अगदी इच्छा भोजनच ते. आणि एवढे असून गिफ्ट आणू नका अशी नम्र विनंती (अगदी पुष्पगुच्छसुद्धा नको). वा वा काय औदार्य. उलट अमेरिकेत 'आम्हाला काय हवे' याचे लग्नाच्या निमंत्रणाबरोबर वॉरंटच येते.

अमेरिकेत जेवण झाल्यावर डीजेने पंजाबी गाण्यांचा धुमाकुळ सुरू केला की माझा संयम संपतो. टेबलावर खास उपस्थितांसाठी ठेवलेली गिफ्टची बॉक्स घेऊन मी घरचा रस्ता धरतो. त्या बॉक्समध्ये गणपती नंबर १३१ आहे याची मला खात्री असते म्हणून मी घरी आल्यावर तो बॉक्स उघडतसुद्धा नाही. एक दिवस स्मिथसोनियन संग्रहालयाला मी ते गणपती भेट देऊन टाकणार आहे. मग सहा महीन्यांनी वधु वरांकडून 'काका तुमच्या गिफ्टबद्दल धन्यवाद' हे कार्ड येते तेव्हां त्याच जोडप्याची बेबी शॉवरची तयारी सुरू झालेली असते.

'वेडिंग क्रॅशर्स' हा सिनेमा मी नुकताच पाहिला. अमेरिकेत असे घडणे शक्य आहे का याबद्दल मला शंका आहे. मात्र भारतात हे सहज शक्य आहे. चित्रपट आवडला तर त्याच्या कल्पनेचा समाजहितासाठी उपयोग करावा असे मनात येऊन मी 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला एक प्रकल्प सादर करण्याचा विचार करीत आहे. भारतात एक सेवादायी संस्था सुरू करून रस्त्यावरील भिकाऱ्यांना गोळा करून, त्यांना आंघोळ करण्याची सोय उपलब्ध करून देणार, चांगले कपडे पुरविणार आणि नीट पढवून माझ्या व्हॅनमधे घालून लग्नाची रिसेप्शन्स होतात त्या लॉन्सच्या जवळ नेऊन सोडणार. काही वेळाने त्या लॉन्सवरील चाट, इंडियन चायनीज, पंजाबी डिशेस यांचा भरपूर आस्वाद घेऊन ते लोक समाधानी चेहेऱ्याने बाहेर पडताना दिसतील; तेव्हां व्हॅनमध्ये बसल्याबसल्या माझे पोट भरले असेल.

– मोहन रानडे

(HOLLAND, PA)

बृहन् महाराष्ट्र वृत्ताच्या सौजन्याने

************

**(भिसे, कारखानीस कुटुंबीय आणि 'मायबोलीचा विश्वसेतू'च्या सह-संपादकांच्या परवानगीने 'मायबोलीचा विश्वसेतू' या पुस्तकातून)**